# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## पंढरपुरात १५ दिवस मटण-मांस विक्रीवर कडक बंदी; आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा मोठा निर्णय

सोलापूर दि.१४ (प्रतिनिधी)- आषाढी वारीच्या निमित्ताने विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन पंढरीत दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी प्रशासनाने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भाविकांच्या धार्मिक भावनांचा आदर करत, पंढरपूर शहर आणि नजीकच्या परिसरात १५ जुलै ते २९ जुलै असे सलग १५ दिवस मांस आणि मटण विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी हे कडक आदेश काढले आहेत. आषाढी यात्रेच्या पवित्र काळात राज्यभरातून लाखो वारकरी पायी चालत पंढरपुरात येतात. या कालावधीत शहरात मांस आणि मटणाची विक्री सुरू राहिल्यास भाविकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. याची दखल घेत प्रशासनाने हा मोठा निर्णय घेतला आहे. पुढील १५ दिवस मटण विक्रीला बंदी असणार असून, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर आणि कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. या निर्णयामुळे मांसाहारी खवय्यांची थोडी गैरसोय होणार असली, तरी वारकरी संप्रदायाकडून या निर्णयाचे मोठे स्वागत केले जात आहे. एकीकडे प्रशासनाने मटण विक्रीवर बंदी आणून धार्मिक पावित्र्य जपण्याचा प्रयत्न केला आहे, तर दुसरीकडे एसटी महामंडळाने वारकऱ्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आषाढी यात्रेच्या तोंडावर पंढरपूर आगारामध्ये ५ नव्या कोऱ्या राजमाता जिजाऊ बसेस दाखल झाल्या आहेत.


(वर्ष ६५ वे अंक १८०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१५ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी बाजारपेठ, शेतकऱ्यांना दिलासा

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय, एसटी बसस्थानकांचा कायापालट होणार

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकरी, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासाला मोठी गती देण्यासाठी राज्य सरकारने आज महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै रोजी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ अत्यंत महत्त्वाचे आणि राज्याचा चेहरामोहरा बदलणारे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. राज्यातील कृषी क्षेत्राला बळकटी देणे, शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून बाहेर काढणे आणि राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास करणे हे राज्य सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे, महायुती सरकारने याच धोरणावर भर दिला आहे. विशेषतः शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कर्जमाफीच्या निकषांमध्ये केलेले बदल आणि एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्याचे निर्णय राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरणार आहेत.

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील मौजे दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारला जाणार आहे. यासाठी दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाला देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे पालघर आणि ठाणे परिसरातील शेतकऱ्यांना जागतिक दर्जाच्या पणन सुविधा उपलब्ध होतील.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ च्या निकषांमध्ये मोठी सुधारणा करण्यात आली आहे. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करून त्यांना नियमित कर्जमाफी दिली जाईल. तसेच, २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्यामुळे राज्यातील तब्बल २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना उत्पन्नाचे नवे मार्ग शोधता यावेत, यासाठी मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरण मंजूर करण्यात आले आहे.

शहरांमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या आधुनिकीकरणासाठी २४.९५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यात सिंथेटिक ॲथलेटिक ट्रॅक, विविध खेळांची मैदाने आणि वसतिगृहाचा समावेश आहे.

अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ अंतर्गत, निर्दोष सुटलेल्या आणि परिविक्षाधीन कैद्यांना देण्यात येणारे सहायक अनुदान २५ हजार रुपयांवरून थेट ५० हजार रुपये इतके करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यभरातील जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील अतिरिक्त जागांचा आणि बसस्थानकांचा पीपीपी तत्त्वावर विकास करण्यास मान्यता देण्यात आली आहे. गौण खनिज उत्खनन नियमात बदल: महसूल व वन विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयांनंतर आता संबंधित विभागांकडून तातडीने शासन निर्णय जारी केले जातील. दापचरी येथील कृषी बाजारपेठेचा आराखडा तयार करून निविदा प्रक्रिया राबवली जाईल. तसेच, राज्यातील एसटी बसस्थानकांचा व्यावसायिक आणि प्रवासी सुविधांच्या दृष्टीने विकास करण्यासाठी खासगी कंपन्यांसोबत भागीदारी करण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल. कर्जमाफीच्या निकष बदलामुळे पात्र शेतकऱ्यांच्या याद्या अद्ययावत करून त्यांच्या खात्यात थेट लाभ जमा करण्याची प्रक्रिया सुरू होईल. या ८ धडाकेबाज निर्णयांमुळे राज्याच्या ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांना मोठी चालना मिळणार आहे. ५० हजार रुपयांची मर्यादा आणि नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने राज्यातील एकूण ३६ लाख (१३ लाख + २३ लाख) शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी फुटणार आहे. एसटीच्या जागांच्या विकासामुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा मिळतील आणि एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढेल. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःच्या मालमत्तांतून उत्पन्न मिळवण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शहरांचा विकास वेगाने होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ३० जुलैपूर्वी कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात; कृषीमंत्र्यांची घोषणा

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- राज्यातील बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणात सरकारने कडक भूमिका घेतली असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या १८ बियाणे कंपन्यांविरोधात कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी त्यांनी कर्जमाफी, पावसाची स्थिती, पिकांचे नुकसान आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत चर्चांवरही भूमिका स्पष्ट केली.

भरणे म्हणाले की, राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे मोठ्या प्रमाणावर आल्या. त्यानंतर कृषी विभागाने तातडीने तपासणी मोहीम राबवली. सर्वाधिक तक्रारी अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, वाशिम, लातूर आणि धाराशिव या दहा जिल्ह्यांतून प्राप्त झाल्या.

कृषिमंत्र्यांनी सांगितले की, राज्यभरातून सोयाबीन बियाण्यांचे ५,६३८ नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. त्यापैकी ५८१ नमुने अप्रमाणित आढळले. या प्रकरणात संबंधित कंपन्यांविरोधात १८१ न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात येत आहेत. उगवण क्षमतेबाबत आलेल्या ३,६१५ तक्रारींपैकी १,७३८ तक्रारींची तालुकास्तरीय समित्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन तपासणी केली आहे. एकूण १८ बियाणे कंपन्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या असून दोषी कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यापैकी बूस्टर प्लांट जेनेटिक्स लिमिटेड, रवी हायब्रिड, पार्श्व जेनेटिक्स, इनोव्हा सीड्स, ओसवाल सीड्स, केडीएम सीड्स, ग्रीन गोल्ड सीड्स, आदित्य सीड्स, अंकुर सीड्स, श्री सीड्स आदी कंपन्यांविरोधात तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. बूस्टर प्लांट जेनेटिक्सविरोधात तीन तर रवी हायब्रिड सीड्सविरोधात एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या प्रकरणात कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. ज्या ठिकाणी आवश्यक असेल तेथे शेतकऱ्यांना बियाणे बदलून देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. भविष्यात अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. कर्जमाफीबाबत बोलताना भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र त्यानंतर पावसाळी अधिवेशन, पुरवणी मागण्या आणि राज्यपालांच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी लागली. आता ही प्रक्रिया पूर्ण झाली असून आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची यादी केंद्र सरकारकडून मिळाल्यानंतर लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाईल. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री स्वतः केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी याबाबत चर्चा केली असून आवश्यक माहिती लवकरच उपलब्ध होईल. ३० जुलैपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# ५ भीषण स्फोटांनी हादरलं इराण! अमेरिकेच्या हल्ल्यानंतर पलटवार; ट्रम्प यांना दिलं सडेतोड उत्तर

वॉशिंग्टन दि.१४ (वृत्तसंस्था)- मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचा मोठा भडका उडाला आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या होर्मुज सामुद्रधुनी भागात युद्धाढग गडद झाले असून, जगावर पुन्हा एकदा तेल संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणचे महत्त्वाचे शहर बंदर अब्बास आणि अणू ऊर्जा प्रकल्प असलेल्या बुशहर परिसरामध्ये एकापाठोपाठ एक ५ भीषण स्फोट झाले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुजमध्ये इराणची नाकेबंदी करण्याची आणि जहाजांकडून शुल्क वसूल करण्याची घोषणा केल्यानंतर हा संघर्ष कमालीचा पेटला आहे. यावर इराणच्या लष्कराने अमेरिकेल ा थेट इशारा दिला असून, 'अमेरिकेची दादागिरी आणि लष्करी कारवाईसमोर इराण कधीही झुकणार नाही,' असे स्पष्ट केले आहे.

इराणची सरकारी वृत्तसंस्था 'आयआरएनए'ने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य इराणमधील बुशहर शहरात चार वेगवेगळ्या ठिकाणी अमेरिकेने मिसाईल हल्ले केले आहेत. विशेष म्हणजे, बुशहर याच भागात इराणचे महत्त्वाचे अणू ऊर्जा प्रकल्प आहेत. या हल्ल्यापूर्वी इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दक्षिण भागातील बंदर अब्बास शहराजवळ किमान ५ मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचे वृत्त दिले होते. या हवाई हल्ल्यांमुळे संपूर्ण इराणमध्ये हाय-अलर्ट (पान ४ वर)

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीचा २० जुलैला चलो संसद मार्च

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- नीटपेपरफुटी प्रकरणी कॉक्रोच जनता पार्टी गेल्या २५ दिवसांपासून दिल्लीत आंदोलन करत आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी पाठिंबा दिला असून, ते स्वत: १७ दिवसांपासून जंतर मंतरवर उपोषण करत आहेत. नीटपेपरफुटीची जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीने केली आहे. २५ दिवसांनंतरही सरकारकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आता पार्टीने देशातील २० बड्या नेत्यांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, संजय राऊत, जे. पी. नड्डा, नितीन नबीन, ओवेसी, ओमर अब्दुल्ला यासह २० नेत्यांना पार्टीच्या वतीने पत्र पाठविण्यात आले आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. सोनम वांगचुक देखील या मागणीसाठी गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करत आहेत. देशभरातून विविध नेत्यांनी दिपके आणि वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. पण, सरकारकडून चर्चेसाठी अद्याप कोणीही समोर आलेले नाही. यानंतर आता कॉक्रोच जनता पार्टीकडून देशातील २० बड्या नेत्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. नेत्यांनी जंतर-मंतरवर येऊन आंदोलनाला आणि सोनम वांगचुक यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती या पत्रातून करण्यात आली आहे.

कॉक्रोच जनता पार्टीकडून भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्यासह जे.पी. नड्डा यांना देखील पत्र पाठवले आहे. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, कनिमोझी. तिरुची सिवा, अखिलेश यादव, राम गोपाल वर्मा, लावू श्री कृष्णा देवारायालू, संजय कुमार झा, संजय राऊत, तेजस्वी यादव, मिश्रा भारती, पी. व्ही. मिथून रेड्डी, चंद्र शेखर आझाद, जे. पी. नड्डा, नितीन नबीन, चंद्रबाबू नायडू, विजय, ओवेसी, ओमर अब्दुल्ला, अगा सईद रुहुल्ला मेहदी अशा २० नेत्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. यातील काही नेत्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. बाकिच्यांनी आंदोलनस्थळी देऊन देशातील युवकांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन कॉक्रोच जनता पार्टीने केले आहे.

कॉक्रोच जनता पार्टीकडून 'चलो संसद' मार्चची घोषणा करण्यात आली आहे. २० जुलै रोजी हे मार्च आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये अनेक नेत्यांनी सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. विशेष म्हणजे २० तारखेपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन देखील सुरु होत आहे. राहुल गांधींसह विविध नेत्यांनी कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनात हजेरी लावल्यास अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची शक्यता आहे. तसेच, आंदोलनाची धारही तीव्र होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आता या २० नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

# सुनेत्रा पवारांची अध्यक्षपदी निवड कायदेशीरच, सच्चिदानंद सिंह यांच्या नोटिशीवर सुनील तटकरेंचे स्पष्टीकरण

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांच्या झालेल्या निवडीला पक्षातूनच आव्हान देण्यात आल्याने खळबळ उडाली होती. मात्र, आता यावर पक्षाचे नेते सुनील तटकरे यांनी पहिली प्रतिक्रिया देत पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. सुनेत्रा पवार यांची निवड पूर्णपणे कायदेशीर असून, सच्चिदानंद सिंह यांनी पाठवलेल्या नोटिशीत कोणतेही तथ्य नाही, असा दावा तटकरे यांनी केला आहे.

सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आक्षेप घेणाऱ्या नोटिशीबाबत बोलताना सुनील तटकरे यांनी पक्षातील अंतर्गत वादाच्या चर्चा फेटाळून लावल्या. ते म्हणाले की, "अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांची झालेली निवड ही पूर्णपणे योग्य पद्धतीने आणि कायदेशीरच झालेली आहे. कुणीतरी एखादी व्यक्ती पत्र किंवा नोटीस पाठवते, याचा अर्थ पक्षात असंतोष आहे असा होत नाही. सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वात संपूर्ण पक्ष एकत्रितपणे आणि एकसंध होऊन काम करत आहे." तसेच, (पान ४ वर)

# राहुल गांधींना चुकीचे ब्रीफिंग मिळते, चंद्रशेखर बावनकुळे यांचा पलटवार

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर देताना, "राहुल गांधींना महाराष्ट्राबाबत योग्य माहिती दिली जात नाही. त्यांना चुकीचे ब्रीफिंग मिळत आहे," असा दावा केला. याचवेळी त्यांनी राज्य सरकारने पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंतची सर्वात कठोर कारवाई केल्याचे सांगत, दोषींना पुन्हा अशी हिंमत होणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. पत्रकार परिषदेत बोलताना बावनकुळे यांनी दुबार पेरणी, बोगस बियाणे, भेसळयुक्त दूध, ऑपरेशन टायगर, अनधिकृत झाडांच्या दुर्घटना आणि राष्ट्रवादी काँग्रेसबाबतच्या चर्चांवरही भूमिका मांडली.

राहुल गांधी यांनी पेपरफुटीच्या मुद्द्यावर राज्य सरकारवर केलेल्या टीकेला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने या प्रकरणात आजवरची सर्वात गंभीर कारवाई केली आहे. त्यांच्या मते, पेपरफुटीच्या साखळीवर कठोर कारवाई झाल्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.

राहुल गांधींना महाराष्ट्रातील घडामोडींविषयी चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोप करत बावनकुळे म्हणाले, "त्यांना जर योग्य माहिती हवी असेल तर चांगले ब्रीफिंग करणारे लोक पाठवू." पावसाच्या अनियमिततेमुळे किंवा बोगस बियाण्यांमुळे ज्या शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे, त्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतल्याची माहिती त्यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयानुसार, अशा शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी लागणाऱ्या बियाण्यांचा खर्च स्वतः करावा लागणार नाही. जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) आणि कृषी विभागाच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून शासनच बियाणे उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांविरोधात मोठी मोहीम सुरू असल्याचे सांगताना बावनकुळे म्हणाले की, अकोला, अमरावती, नागपूर, यवतमाळसह विविध जिल्ह्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ज्या कंपन्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, त्यांच्यावर एफआयआर दाखल करून अटक करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मध्य प्रदेशातून येणाऱ्या संशयित बियाण्यांवरही विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये एटीएसची कारवाई, एकाचवेळी ६० ठिकाणी धडाधड छापे

पुणे दि.१४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र एटीएसने अनेक मोठ्या शहरांमध्ये कारवाई सुरू केली आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी छापेमारी सुरू केली आहे. पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी आणि त्याच्या कथित आयएसआय (घएघ) संपर्कांच्या अनुषंगाने ६० हून अधिक संशयित व्यक्तींवर एटीएसची नजर असून, त्यांच्या घरांवर एकाचवेळी छापे टाकण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, आयएसआयकडून शहजाद भट्टीच्या माध्यमातून भारतातील काही तरुणांना देशविरोधी कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होत असल्याचा एटीएसला संशय आहे. त्याच अनुषंगाने या संशयितांची चौकशी आणि पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

यापूर्वीही काही दिवसांपूर्वी राज्यातील विविध भागांत एटीएसने याच प्रकरणाशी संबंधित छापेमारी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा एटीएसने राज्यभर कारवाईची मोहीम तीव्र केली (पान ४ वर)

# जागतिक पर्यावरण कामगिरी निर्देशांकात भारत १७६ व्या स्थानावर; हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न चिंताजनक

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- जागतिक पर्यावरण कामगिरी निर्देशांक (एन्व्होरमेंटल परफॉर्मन्स इंडेक्स इपीआय) २०२६ मध्ये १७७ देशांमध्ये भारत १७६ व्या स्थानी आहे. तसेच दक्षिण आशियातील आठ देशांमध्ये भारत शेवटच्या स्थानावर आहे. जागतिक स्तरावर हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होत असताना, पर्यावरण कामगिरी निर्देशांकातील भारताचे १७६वे स्थान चिंताजनक मानले जात आहे. यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालात हवा प्रदूषण, हरितगृह वायूंचे वाढते उत्सर्जन आणि परिसंस्था संरक्षणाबाबत ठोस उपाययोजनांचा अभाव आदी मुद्देही अधोरेखित केले आहेत.

अमेरिका येथील येल आणि कोलंबिया विद्यापीठांसह विविध संशोधन संस्थांतील तज्ज्ञांकडून दर दोन वर्षांनी जागतिक पर्यावरण कामगिरी निर्देशांक (एन्व्हायर्नमेंटल परफॉर्मन्स इंडेक्स इपीआय) प्रसिद्ध केला जातो. यात पर्यावरणासंदर्भातील विविध मुद्द्यांचा आढावा घेतला जातो. ज्यात पर्यावरणाची एकूणच स्थिती, जैवविविधतेचे संवर्धन याचबरोबर हवामान बदलाच्या समस्येवर राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे मूल्यमापन केले जाते. प्रत्येक अहवालाची कार्यपद्धती निराळी असते, तसेच निर्देशकांमध्ये काही बदल करण्यात येतात. यंदाच्या अहवालात एकूण १७७ देशांचे ४७ पर्यावरणीय निर्देशांकाच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले असून त्याआधारे अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. ज्यात भारताचा क्रमांक शेवटून दुसरा (१७६ वा) आहे. यात एकूण १०० गुणांपैकी भारताला केवळ २२.४६ गुण मिळाले असून दक्षिण आशियामधील देशातही भारताचे स्थान शेवटचे आहे. दरम्यान, या अहवालानुसार, एस्टोनियाने ७४.७९ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. एस्टोनिया हा उत्तर युरोपातील एक छोटा देश आहे. तो बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर वसला असून बाल्टिक देशांपैकी एक आहे.

'पर्यावरणीय आरोग्य' या निकषात भारताचा १७४ वा, 'परिसंस्था संवर्धना'त १७१ वा आणि हवामान बदलाच्या समस्येवर राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांमध्ये १३० वा क्रमांक लागला आहे.

# थेट राम मंदिरावर दरोडा, संघाची नाराजी हास्यास्पद; हर्षवर्धन सपकाळांचा भाजप-आरएसएसवर हल्लाबोल

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राम मंदिर ट्रस्टमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती, शेतकरी प्रश्न, महायुती सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींवरून राज्य सरकार तसेच भाजपवर जोरदार टीका केली. "राम मंदिरावर थेट दरोडा पडला आहे. केवळ नाराजी व्यक्त करून काही होणार नाही," असे म्हणत त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही थेट लक्ष्य केले. मराठवाड्यातील काँग्रेसच्या संघटनात्मक आढावा बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध राजकीय आणि सामाजिक विषयांवर भूमिका मांडली.

राम मंदिर उभारणीसाठी गोळा करण्यात आलेल्या देणग्यांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप होत आहे. यावर सपकाळ म्हणाले, "हा केवळ एका कोषाध्यक्षाचा घोटाळा नसून संपूर्ण विश्वस्त मंडळाचा यात सहभाग आहे. आधी अभिमानाने सांगायचे की विश्वस्त मंडळात संघाचे लोक आहेत. आता थेट राम मंदिरावर दरोडा पडल्यानंतर संघ केवळ नाराजी व्यक्त करत आहे, हे हास्यास्पद आहे. जर राष्ट्रीय स्वयंसेवक संघात (पान ४ वर)

# एमपीएससी ऑनलाईन परीक्षा विद्यार्थ्यांवर लादली जाणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शिष्टमंडळाला आश्वासन



पुणे दि.१४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) सर्व पदभरती परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र, या निर्णयाला राज्यभरातून विरोध होत आहे. या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ऑनलाइन परीक्षांना विरोध असलेल्या शिष्टमंडळाने मंगळवारी भेट घेतली. 'ऑनलाइन परीक्षा स्पर्धा परीक्षार्थ्यांवर लादली जाणार नाही. एमपीएससीचे अध्यक्ष, सचिवांबाबत या बाबत चर्चा करण्यात येईल,' अशी भूमिका फडणवीस यांनी मांडली. या बैठकीनंतर एमपीएससीच्या ऑनलाइन परीक्षांचा निर्णय होईपर्यंत बुधवारी (१५ जुलै) आयोजित करण्यात आलेला मोर्चा स्थगित करण्याचा निर्णय संघटनांनी घेतला आहे. (पान ४ वर)

# सर्वसामान्यांच्या रोजच्या ताटात विष!

माणसाच्या मूलभूत गरजांपैकी सर्वांत महत्त्वाच्या असलेल्या अन्नातच किती मोठ्या प्रमाणावर भेसळ सुरू आहे, हे गेल्या काही दिवसांत एफडीएने केलेल्या कारवाईतून समोर आले आहे. त्यामुळे आपण जे अन्न खातो ते खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न आता सर्वसामान्यांना सतावत आहे. तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात कारवायांचा धडाका लावला आहे. आतापर्यंत राज्यभरात ९०४ ठिकाणी छापे टाकण्यात आले. त्यातून ३४.६६ कोटी रुपयांचा प्रतिबंधित आणि भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला. २३५ गुन्हे दाखल झाले, ४५७ जणांना अटक करण्यात आली आणि २७४ आस्थापना सील करण्यात आल्या. ही राज्यातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या अन्नसुरक्षा मोहिमांपैकी एक आहे. या आकड्यांवरून स्पष्ट होते, की भेसळीचा हा धंदा किती मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. छाप्यांमध्ये सापडलेला माल पाहिला तर काळजी वाटते. त्यात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखू तर आहेच, पण त्याहून धोकादायक म्हणजे, नकली दूध, नकली पनीर आणि निकृष्ट दर्जाचा मावा. रसायने आणि व्हे प्रिमिक्स पावडर वापरून दूध बनवले जात आहे. एक्सपायरी झालेले अन्नपदार्थ तारीख बदलून पुन्हा विकले जात आहेत.

विचार करा, सकाळी सकाळी आपल्या मुलांना दिलेले ग्लासभर दूध, सणाला घरी बनवलेली बासुंदी, लग्नात वाढलेली पनीरची भाजी, यात जर भेसळ असेल तर? दूध हे संपूर्ण आहार मानले जाते. त्यातच जर पाणी, युरिया किंवा रसायन मिसळले असेल, तर कॅल्शियम आणि प्रोटीनऐवजी आपण चक्क आजार विकत घेतोय... लहान मुलांच्या वाढीवर, गर्भवती महिलांच्या आरोग्यावर आणि वृद्धांच्या किडनीवर याचा थेट परिणाम होतो.निकृष्ट मावा आणि कालबाह्य पदार्थांमुळे फूड पॉयझनिंग, कावीळ, पोटाचे विकार तर वाढतातच, पण त्याहून गंभीर म्हणजे दीर्घकाळ अशा अन्नाचे सेवन केल्याने कर्करोग, हार्मोनल बिघाड आणि प्रतिकारशक्ती कमी होण्याचा धोका असतो. ९०४ ठिकाणी छापे आणि ३४ कोटींची जप्ती म्हणजे ही काही एक-दोन दुकानदारांची लबाडी नाही. ही एक संघटित साखळी आहे. उत्पादक, घाऊक विक्रेता, वाहतूकदार आणि किरकोळ विक्रेता या सगळ्यांचा यात सहभाग आहे. नफ्यासाठी म णसांच्या आरोग्याशी खेळणारे हे एक मोठे रॅकेट आहे.

सगळ्यात वाईट बाब म्हणजे याचे बळी सर्वसामान्य नागरिक होतात. महागाईमुळे स्वस्त पर्याय शोधणारा मध्यम वर्गीय आणि गरीब माणूसच या भेसळीच्या जाळ्यात अडकतो. त्याला माहितीही नसते की तो काय खात आहे. तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे व्यापाऱ्यांमध्ये धाक निर्माण झाला आहे. ४५७ जणांना अटक आणि २७४ आस्थापना सील यामुळे 'दंड भरून मोकळे होऊ' ही मानसिकता मोडली आहे. 'अन्नात भेसळ केली तर सुटका नाही' हा संदेश यातून गेला आहे. यासाठी तुकाराम मुंढे यांचे मनापासून आभार. परंतु, एका मोहिमेने हा प्रश्न सुटणार नाही. अशा धडक म ोहिमा अधूनमधून होऊन उपयोग नाही. वर्षभर, दर महिन्याला अचानक तपासणी झाली पाहिजे. म्हणजे प्रत्येक व्यापाऱ्याला कधीही छापा पडू शकतो ही भीती राहील.गुन्हे दाखल होऊन वर्षानुवर्षे केस चालतात. तोपर्यंत आरोपी जामिनावर बाहेर येऊन पुन्हा धंदा सुरू करतात. त्यामुळे अशी प्रकरणे फास्टट्रॅक कोर्टात चालवून लवकरात लवकर त्यांचा निकाल लागला पाहिजे आणि दोषींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून पुन्हा दुसरा कोणी भेसळ करायला घाबरेल. अन्नसुरक्षा ही फक्त एफडीएची जबाबदारी नाही. ती सरकारची, उत्पादकांची, विक्रेत्यांची आणि आपलीही आहे. तुकाराम मुंढे यांनी काडी टाकली आहे. आता त्याची आग होऊन संपूर्ण व्यवस्था स्वच्छ झाली पाहिजे.

भेसळमुक्त अन्न हा आपला अधिकार आहे आणि तो मिळवण्यासाठी आता आपण सगळ्यांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. त्यासाठी आपणही वैयक्तिक पातळीवरही काही गोष्टी नक्की करू शकतो. प्रत्येक नागरिकाने खाद्यपदार्थांचे बिल मागितलेच पाहिजे, पॅकिंगवर ऋडडअख चा लोगो, बॅच नंबर आणि एक्सपायरी डेट तपासली पाहिजे. घरात, शाळा आणि महाविद्यालयांत अन्नसुरक्षेचे धडे दिले पाहिजेत. कारण, एकदा आरोग्य गेले की ते परत मिळवता येत नाही आणि ते जपायचे असेल तर सुरुवात आपल्या ताटापासूनच करावी लागेल.

# 'महिला आरक्षण व डिलिमिटेशन –कही पे निगाहे कही पे निशाना'

**सध्या** देशात भारतातील लोकसभा मतदासंघांची पुनर्रचना व त्याबरोबर ३३% महिला आरक्षण या दोन विषयांनी राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. एप्रिल २०२६ मध्ये सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन घेऊन वरील दोन्ही विधेयके एकत्र करून घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केला.घटना दुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी लोकसभा व राज्यसभेत स्वतंत्रपणे २/३ बहुमताची गरज भासते.लोकसभेत ही विधेयके २/३ बहुमत न मिळाल्याने मंजूर होऊ शकली नाहीत, त्यामुळे राज्यसभेत हे विधेयक सादर करण्याचा प्रश्नच उद्भवला नाही.

आता बदललेल्या राजकीय परिस्थितीत सरकार परत ही दोन्ही विधेयके संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पेश करणार असल्याची बातमी आहे. ही घटना दुरुस्ती मंजूर करून घेण्यासाठी आवश्यक २/३ बहुमताची जुळवणी दोन्ही सभागृहात करण्यासाठी भाजप वेगवान राजकीय हालचाली करत आहे. एकदा ही जुळवाजुळव पूर्ण झाली की विधेयके संसदेत सादर होतील.

इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की 'डिलिमि टेशनचे बिल हे साध्या बहुमताने पास होऊ शकते कारण घटनेमध्ये डिलिमिटेशनची तरतूद आधीपासूनच अस्तित्वात आहे.पण महिलांसाठी लोकसभेत ३३% आरक्षण ठेवण्यासाठी मात्र घटनादुरुस्तीची गरज भासते आणि या बिलासाठी २/३ बहुमताची आवश्यकता आहे. मग आपल्याला प्रश्न पडू शकेल की सरकारने आधी 'डिलिमिटेशन' चे विधेयक स्वतंत्रपणे साध्या बहुमताने मंजूर करून घेऊन मग 'नारी शक्ती वंदना' बिल आणले असते तर चालले नसते का. इथेच खरी ग्यानबाची मेख आहे ती कशी ते समजावून घेऊ.

डिलिमिटेशन यापूर्वी कधी झाले नव्हते का, तर ते निश्चितच काही ठराविक कालबद्धतेने होत होते. त्यात मतदारसंघांची फक्त पुनर्रचना होत असे पण मतदारसंघांची संख्या वाढत नव्हती. सध्याची आपली लोकसभेची सदस्यसंख्या (५४३) ही १९७१पासून कायम आहे. १९७६ मध्ये संसदेने ही सदस्य संख्या पुढील २५ वर्षे वाढवायची नाही असे ठरवले. २००१ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाल्यावर एन. डी. ए. सरकार असताना संसदेने पुन्हा पुढील २५ वर्षे लोकसभेची सदस्य संख्या वाढवायची नाही असे बंधन घातले. तो २५ वर्षाचा कालावधी २०२६ मध्ये पूर्ण झाल्याने सरकारने आता लोकसभेच्या जागा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय तर्कशुद्ध आहे.गेल्या ५० वर्षात भारताची लोकसंख्या दुपटीपेक्षा अधिक वाढली आहे त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या त्याच प्रमाणात वाढली आहे. एकच खासदार एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडतो. हा एक प्रकारे जनतेवरही अन्याय आहे. आता सरकारने जागा वाढवल्यावर प्रत्येक मतदारसंघाचे एक किंवा अधिक मतदारसंघात विभाजन होईल व त्याच प्रम ाणात लोकप्रतिनिधींची संख्याही वाढेल आणि त्याम ुळे खासदारांची कार्यक्षमताही वाढेल अशी अपेक्षा आहे. या डिलिमिटेशनचा आणि ३३'% महिला आरक्षणाचा परस्पर संबंध काय?

सरकारने नोव्हेंबर २०२३ मध्येच ३३% महिला आरक्षणाचे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेतले होते. हे विधेयक एकमताने मंजूर झाले होते. या विधेयकात अशी तरतूद केली होती की हे आरक्षण सर्वात ताज्या जनगणनेवर व त्यानंतरच्या डिलिमिटेशन प्रक्रियेवर आधारित असेल त्यामुळे २०२९ च्या निवडणुकीतच याची अंमलबजावणी होईल. पण २०२१ मध्ये कोविडमुळे जनगणना होऊ शकली नाही. आता २०२६ मध्ये जनगणना सुरु झाली आहे पण ती पूर्ण होऊन त्यानंतर डिलिमिटेशनची प्रक्रिया २०२९ पूर्वी पूर्ण होणे अशक्य आहे. महिला आरक्षण २०२९ च्या नि वडणुकीपासून अमलात आणण्यासाठी सरकारने असा व्यवहारिक निर्णय घेतला की २०११ च्या जनगणनेच्या आधारे डिलिमिटेशन करायचे आणि त्यानुसार लोकसभेची सदस्यसंख्या ८३० पर्यंत वाढवायची. प्रत्यक्ष डिलिमिटेशन हा एक अत्यंत वेळखाऊ प्रोसेस असल्याने तोही २०२९पर्यंत पूर्ण होणे कठीण आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने सरसकट प्रत्येक राज्याच्या अस्तित्वात असलेल्या लोकसभा मतदारसंघात ५०% वाढ करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

विरोधी पक्षांचे असे म्हणणे आहे की सरकारने नुसते तोंडी आश्वासन न देता हा प्रस्ताव लिखित स्वरूपात विधेयकात समाविष्ट करावा. सरकारने तशी तयारी दाखवल्याची बातमी आहे.काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांचे असेही म्हणणे आहे की सध्याच्या ५४३ सदस्यांच्या सभागृहातच महिला आरक्षण लागू करून त्यानुसार २०२९ ची लोकसभा निवडणूक पार पाडावी. डिलिमिटेशन व महिला आरक्षण हे विषय एकमेकांशी जोडू नयेत.विरोधकांचे हे म्हणणे सरकारला मान्य नाही.इथेच राजकारणाचा कळीचा मुद्दा आडवा येतो.

सध्याच्या एकूण ५४३ सदस्यसंख्येच्या ३३% जागांची संख्या येते १८१.जर एवढ्या जागा म हिलांसाठी आरक्षित राहिल्या तर खुल्या जागांची संख्या एकदम कमी होते. या जागांवर आधी निवडून आलेले पुरुष खासदार विस्थापित होतील. त्यांना कुठे ऍडजस्ट करायचे ही सर्वच राजकीय पक्षांची डोकेदुखी होईल. त्यातून प्रचंड प्रमाणात बंडखोरीची समस्या सर्वच राजकीय पक्षात निर्माण होईल. भाजपची खासदार संख्या लोकसभेत सर्वाधिक असल्याने त्यांना बंडखोरीचा उपद्रव अधिक होईल असा विरोधकांचा कयास आहे. त्यातून भाजपचा जो तोटा तो आपला फायदा असे गणित विरोधकांचे आहे.भाजपला विरोधकांचा हा डाव लक्षात आल्याने त्यांनी लोकसभेतील जागा वाढवून मगच महिला म हिला आरक्षण अमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रस्तावित वाढीव ८३० सदस्य संख्येच्या १/३ इतक्या जागांचा आकडा येतो २७३. म्हणजेच २७३ जागा महिलांसाठी आरक्षित झाल्यावर सुद्धा ५५७ जागा पुरुष उमेदवारांसाठी खुल्या राहतील. यामुळे सध्याच्या पुरुष खासदारांना अकोमोडेट करता येईल आणि त्यायोगे बंडखोरीच्या समस्येवर उतारा होईल असा भाजपचा अंदाज आहे.

दुसरे म्हणजे सध्याची राजकीय परिस्थिती बघता ८३० एवढ्या प्रचंड संख्येच्या मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी लागणारे संघटन फक्त भाजपकडे आहे. (अर्थात संघाच्या मदतीने). तसेच भाजप व मित्र पक्ष मिळून त्यांना उमेदवारांचीही चण चण इतकी भासणार नाही कारण सद्यस्थितीत बहुसंख्य लोकप्रतिनिधींचा कल भाजपमध्ये प्रवेश करण्याचा दिसून येत आहे. त्याउलट काँग्रेससह एकाही इतर विरोधी पक्षांकडे ८३० जागा लढवण्यासाठी लागणारी संघटन शक्ती नाही. एवढ्या जागा लढवण्यासाठी उमेदवार मिळणेही विरोधकांना कठीण जाईल.एवढ्या संख्येने जागा लढवण्यासाठी लागणारे आर्थिक बळ सुद्धा जेवढे भाजपकडे आहे तेवढे विरोधकांकडे नाही. डिलिमिटेशन व महिला आरक्षण विधेयकांचे हे 'साईड इफेक्ट्स' माहित असल्यानेच काँग्रेसचा या विधेयकांना विरोध आहे.

अजून एक निर्णायक घटक हा आहे की डिलिमिटेशनमुळे पश्चिम व उत्तर भारतात जागांची संख्या दक्षिण भारताच्या तुलनेत अधिक राहाणार आहे (आत्ताही हे प्रमाण असेच आहे ). भाजप हा उत्तर पश्चिम भारतात कमालीच्या मजबूत स्थितीत आहे तेवढा दक्षिण भारतात नाही. उलट काँग्रेस हा दक्षिण भारतात जेवढा शक्तिशाली आहे तेवढा उत्तर भारतात नाही.या परिस्थितीत बहुमत गाठण्यासाठी लागणाऱ्या ४१६ जागाचा आकडा गाठण्याइतकी क्षमता भाजपकडे अधिक राहील.तरी सुद्धा ४१६चा आकडा गाठताना कुठल्याही पक्षांची दमछाक होईल.

प्रादेशिक पक्ष तर जागा वाढल्या तरी आपल्या राज्याच्या बाहेर त्यांचे अस्तित्व नसल्याने सत्तेची स्वप्नही पाहू शकणार नाहीत. या प्रादेशिक पक्षांना भाजप किंवा काँग्रेस या पक्षात विलीन होण्याशिवाय पर्याय उरणार नाही. यातूनच भारतात द्विपक्षीय लोकशाही स्थापित होण्याचा मार्ग मोकळा होईल हे एक बायप्रॉडक्ट. दुसरे बायप्रॉडक्ट म्हणजे पक्षांतराला मोठ्या प्रमाणात आळा बसण्याची शक्यता आहे. प्रत्येक पक्षांची सदस्यसंख्या वाढल्यामुळे त्याच्या २/३सदस्यांना फोडणे किंवा वेगळा गट स्थापणे खूप कठीण जाईल. महिला आरक्षण विधेयकाला डिलिमिटेशनच्या वेष्टनात गुंडाळून घटनादुरुस्ती करण्याचा भाजपचा बेत हा एका दगडात अनेक पक्षी मारण्याच्या उद्देशाने प्रेरित आहे हे निर्विवाद.

भाजपने यात स्वार्थ –परमार्थ दोन्ही साधून कही पे निगाहे कही पे निशाना या कुटनीतीचा परीचय करून दिला आहे. जर याही वेळी काँग्रेस व मित्र पक्षांनी या घटना दुरुस्तीला विरोध केला तर त्यांच्यावर ते महिला विरोधी असल्याचा ठपका ठेवता येईल. बिल पास झाले की महिलाना आरक्षण देण्याचे श्रेय भाजपला मिळेलच पण त्याचबरोबर त्यांची अनुषंगिक इतर राजकीय उद्दिष्टेही पूर्ण होतील याचीही काळजी भाजप घेत आहे.

**– रघुनंदन भागवत**

# हजारो कोटींचा विकास जलमय का होतो?

**राज्यकर्ते** नेहमीच विकास, विकास अशी भाषा बोलत असतात, रस्ते, पूल, उड्डाण पूल, पदपथ, मैदाने , बगिचे, जनतेच्या पैशातून उभारली जातात. मुंबई ही राज्याची राजधानी. देशाची आर्थिक राजधानी. देशाला सर्वाधिक महसूल, सर्वाधिक जीएसटी हा मुंबई- महाराष्ट्रातून मिळतो. विदेशातील सर्वाधिक गुंतवणूक मुंबई व महाराष्ट्रात होते. देशात प्रगतीच्या वाटचालीत महाराष्ट्र नंबर १ आहे असे आपण अभिमानाने सांगत असतो. महाराष्ट्र हा युपी, बिहार, ओडिसा, पश्चिम बंगाल, झारखंडपेक्षा सुखावह आहे असा देशभर समज आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे होत आली. मुंबईसह म हाराष्ट्राची निर्मिती होऊन ६६ वर्षे झाली. तरी दरवर्षी पावसाळ्यात देशाच्या आर्थिक राजधानीतील रस्ते का पाण्यासाली जातात ? दर पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे का पडतात ? दरवर्षी रस्ते का खचतात ? पावसाळ्यात दरवर्षी या महानगरात हजारभर झाडे का पडतात ? दरवर्षी चाळी किंवा अनधिकृत इम ारती का कोसळतात ? पावसाळ्यात उपनगरातील भुयारी मार्गांचे तलाव का होतात ? पावसाळ्यात उघड्या म'नहोल मधून मुले किंवा वयस्कर का वाहून जातात ? दरवर्षी पावसाळ्यात दरडी कोसळून किंवा इमारतींच्या ढिगाऱ्याखाली निरापराध लोकांचे का बळी पडतात?

मुंबईची जीवनवाहिनी असलेली उपगरी रेल्वेसेवेतून रोज ८५ लाख मुंबईकर प्रवास करीत असतात. पण दरवर्षी पावसाळ्यात रूळावर पाणी साचल्याने लोकलसेवा तासनतास का ठप्प होते ? मुंबईत आता एसी लोकल्स ची संख्या वाढत आहे, एसी ट'क्सीज व एसी बसेस सर्वत्र धावताना दिसत आहेत. मोनो पाठोपाठ मेट्रो रेल्वेचे जाळे उभारले जात आहे. अटल सेतू, संमृध्दी मार्ग, कोस्टल रोड, याचे श्रेय राज्यकर्ते श्रेय घेत असतात. नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळ झाला. वाढवण बंदराची घोषणा झाली. पालघर परिसरात आता चौथी मुंबई उभारणार अशी घोषणा स्वत: मुख्यमंत्र्यांनी केली आहे. लवकरच बुलेट ट्रेन मुंबईत पोचणार आहे. मुंबई -पुणे ही दोन महानगरे जवळ आणण्यासाठी अगोदर एक्स्प्रेस वे झाला , आता मिसिंग लिंक उभारून अर्धा तास वेळ कमी करण्याचेही श्रेय राज्यकर्त्यांनी घेतले. विकास कामांवर हजारो कोटी खर्च केले जात आहेत. राज्याचे कारभारी इन्फ्रा म'न म्हणून ओळखले जात आहेत. पंचायतीपासून विधानसभेपर्यंत भरभक्कम बहुमताची सत्ता असताना दोनशे- अडिचशे मिमी पाऊस झाला तर मुंबई पाण्याखाली का जाते ? दोष कुणाचा, उत्तरदायित्व कुणाचे ? जबाबदार कोण ? यावर कधी चर्चा होत नाही आणि असे विचारलेले प्रश्न राज्यकर्त्यांना आवडत नाहीत.

मुंबई- पुणे मार्गावर लोणावळा- खंडाळा घाटात सात हजार कोटी खर्च करून मिसिंग लिंग उभारला तेव्हा त्याचे उदघाटन करण्यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व व्हीआयपींचा ताफा दोन महिन्यापूर्वी एक मे रोजी खंडाळा घाटात पोचला होता. जे काँग्रेस पक्षाला सत्तेवर असताना जमले नाही ते आम्ही करून दाखवले, असे अभिमानाने सांगण्यात आले. पण अवघ्या ६७ दिवसात अतिवृष्टीने दरडी कोसळून मिसिंग लिंक ठप्प झाला तेव्हा मात्र कुणी प्रश्न अडचणीचे विचारू नयेत व कोणी राजकारण करू नये अशी अपेक्षा सरकारने बोलून दाखवली. तेव्हाच दया कुछ तो गडबड है, अशी शंका प्रत्येकाच्या म नात आली. चार दिवसांच्या अतिवृष्टीने मुंबई- पुणे हाय वे, एक्स्प्रेस वे आणि रेल्वे मार्गही बंद झाला. मुंबई -गोवा, मुंबई- नाशिक, मुंबई- अहमदाबाद हाय वे बंद होते. मुंबईशी अन्य शहरांचा संपर्क तुटला. मुंबईतील उपनगरी रेल्वे सेवेनेही मान टाकली होती. विकास कुठे आहे, हे काय जलमय झालेल्या रस्त्यांमधे शोधायचे का ? शाळा कॉलेजेसला सुट्टी द्यावी लागली. विधिमंडळ अधिवेशनाचे कामही ओटापते घ्यावे लागले. खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम चा फतवा काढावा लागला. अधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाचा जप करायचा, विकास विकास म्हणत हजारो कोटींची कंत्राटे घाई घाईने द्यायची मग घाईघाईने झालेल्या विकासाची कशी पोलखोल होते हे चार दिवसांच्या मुसळधार पावसाने बघायला मिळाले. यावेळी अतिवृष्टीने म हामुंबई व महाराष्ट्राला मोठा फटका दिला. मुंबई, कोकणाला तर पावसाने झोडपून काढले, नद्यांनी सर्वत्र धोक्याची पातळी ओलांडली. पावसाळ्यात पूर येणार, झाडे पडणार, वाहतूक कोंडी होणार हे गृहित आहे. पण पावसाळ्यात दरवर्षी जनजीवन ठप्प होणार असेल तर विकासाला ब्रेक लागत नाही का ? त्यावर काहीच उपाय नाही का ?

यावर्षी रस्ते, रेल्वे मार्ग, पाण्याखाली गेल्यावर, झाडे- घरे कोसळून नि म'नहोलमधून निरापराध लोकांना जीव गमवावे लागल्यानंतर प्रशासनाला ठेकेदार, दलालांनी कसे घेरले आहे याची मोठी चर्चा झाली. गेल्या पाच- सात वर्षात भ्रष्टाचार वेगाने वाढला आहे. लोकप्रतिनिधी, राज्यकर्ते, नोकरशहा व ठेकेदार- दलालांची साखळी आहे. काँग्रेसच्या काळात भ्रष्टाचार होता म्हणून स्वच्छ व पारदर्शक कारभारासाठी जनतेने भाजपावर विश्वास ठेवला. पण सत्ता परिवर्तन झाल्यावर काँग्रेसपेक्षा टक्केवारीचे प्रमाण दुप्पट- तिप्पट टक्केवारी वाढले आहे, अशी उघड चर्चा होते हे सरकारला काय भूषणावह आहे का ? निविदा मिळिवण्यापासून ते त्याची बिले वसुल होईपर्यंत अनेक टप्प्यांवर अनेकांना पाकिटे द्यावी लागतात. कामाच्या खर्चाच्या ४० ते ४५ टक्के रक्कम खालपासून वरपर्यंत वाटावी लागत असेल तर ते काम दर्जेदार कसे होणार ? त्या कामात गुणवत्ता कशी राहणार ? नगरविकास , महसूल, गृहनिर्माण, रस्ते विकास, महापालिका ही खाती तर भ्रष्टाचाराने बरबटलेली आहेत असे जाहीर आरोप होत आहेत. या खात्यात अनेक कर्मचारी व नोकरशहा वर्षानुवर्षे क्रीम पोस्टींगला आहेत. कारभारी कुणीही असला तरी नोकरशहा, अधिकारी तेच असतात. तेथील कर्मचारी प्रमोशनही नाकारतात. ठराविक पोस्टिंगला प्रचंड कमाई असल्याने वर्षानुवर्षे कर्मचाऱ्यांचा ठिय्या एकाच विभागात एकाच जागेवर असतो. बॉस लोकांनाही हे कर्मचारी सोयीचे असतात कारण ते बॉसला खूश ठेवत असतात. ठराविक बिल्डर्स, तेच ठेकेदार व तेच दलाल व त्यांच्या कामांची शिफारस करणारे लोकप्रतिनिधी यांची साखळी तोडल्याशिवाय भ्रष्टाचार संपणार नाही.

अतिवृष्टीमुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण - डोंबिवली, वसई - विरार, मिरा- भाईदर, भिवंडी, पनवेल या महापालिका क्षेत्रात पावसाने हाहा:कार झाला. सारे काही जलमय झाल्याने दोन कोटी लोकसंख्येचे कमालीचे हाल झाले. उपनगरी सेवा बंद असताना, रस्ते पाण्याखाली असताना, वाहतूक कोंडी असताना, झाडे कोसळून रस्ते बंद झाले असताना त्या भागातील निवडून आलेले नगरसेवक कुठे होते ते शोधावे लागत होते. भाजपाची उमेदवारी मिळाली की आपण निवडून येतो ही नगरसेवक व आमदारांना खात्री आहे. केवळ मोदींच्या नावावर मते मिळाली की पुढे काही काम करावे लागत नाही हे सर्वांनी गृहित धरले आहे. पक्षाचा आदेश असल्याशिवाय नगरसेवक - आमदार जनतेत कुठे दिसत नाहीत. पूर्वी विरोधी पक्षात असताना भाजपाचे लोकप्रतिनिधी नेहमी रस्त्यावर दिसायचे, आता या सर्वांना आयते यश मिळाले असल्याने लोकांना संकटात मदत करण्यासाठी ते सरसावले आहेत ( काही अपवाद वगळता ) असे कुठे दिसले नाही. विकास कामाच्या पैशातून ठेकेदार, नोकरशहा व नेत्यांची चंगळ होणार असेल तर मिसिंग लिंग सारखी त्यांची पोलखोल होत राहील. केलेल्या कामांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले पाहिजे तसेच कुणाचे काय चुकले, याची पारदर्शक चौकशीही झाली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य व धाडस हे विरोधी पक्षाकडे असेल तरच सरकारवर अंकुश राहू शकेल.

# रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभागाची जून २०२६ मधील उल्लेखनीय कामगिरी

नांदेड, दि. १४ (प्रतिनिधी) - नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने जून २०२६ या महिन्यात रेल्वे प्रवाशांची सुरक्षा, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण, हरविलेल्या व्यक्ती व मालमत्तेचा शोध, महिला प्रवाशांना सुरक्षा व सहाय्य तसेच रेल्वे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विविध विशेष मोहिमा प्रभावीपणे राबवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या मोहिमांमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली असून रेल्वे मालमत्तेचे संरक्षण, गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई, हरविलेली मालमत्ता शोधून ती संबंधित प्रवाशांना परत देणे, अल्पवयीन मुलांचे संरक्षण, महिला प्रवाशांना आवश्यक मदत उपलब्ध करून देणे तसेच रेल्वे अधिनियमांतर्गत नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली.

**जून २०२६ मधील प्रमुख कामगिरी :**

● ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' अंतर्गत ३ अल्पवयीन मुलांची सुरक्षित सुटका करून त्यांना बाल कल्याण समिती (CWC) यांच्या स्वाधीन करण्यात आले.

● ऑपरेशन 'अमानत' अंतर्गत हरविलेल्या मालमत्तेच्या १० घटनांमध्ये एकूण ₹2,05,500/- किमतीची मालमत्ता शोधून संबंधित प्रवाशांना परत

## प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष मोहिमा प्रभावी

करण्यात आली.

● ऑपरेशन 'यात्री सुरक्षा' अंतर्गत प्रवाशांच्या सामान चोरी (ToPB) संदर्भातील १७ गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला. २२ संशयित आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ₹1,09,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना शासकीय रेल्वे पोलीस (GRP) यांच्या ताब्यात देण्यात आले.

● ऑपरेशन 'मेरी सहेली' अंतर्गत १,९९७ महिला प्रवाशांना प्रवासादरम्यान सुरक्षा, मार्गदर्शन व आवश्यक सहाय्य प्रदान करण्यात आले.

● ऑपरेशन 'रेल सुरक्षा' अंतर्गत रेल्वे मालमत्तेच्या चोरीसंदर्भात ४ गुन्हे नोंदवून ११ आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ₹8,27,099/- किमतीची रेल्वे मालमत्ता जप्त करण्यात आली.

● रेल्वे अधिनियम अंतर्गत विविध कलमांनुसार ३४१ प्रकरणांमध्ये २८४ जणांविरुद्ध कारवाई करून ₹32,535/- दंड वसूल करण्यात आला. तसेच जन विश्वास अधिनियम अंतर्गत ११८ जणांविरुद्ध कारवाई करून ₹84,000/- दंड आकारण्यात आला.

**प्रवाशांच्या सामान चोरी करणाऱ्या टोळीवर कारवाई**

दि. ०६ जुलै २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानकावर रेल्वे सुरक्षा बलाच्या उखइ पथकाने व ऋठझ, परभणी यांच्या संयुक्त कारवाईत गाडी क्रमांक १७६६२ (निजामाबाद-काचीगुडा एक्स्प्रेस) दरम्यान जनरल डब्यात चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेऊन सामान चोरी करण्याच्या तयारीत असलेल्या चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान संशयितांना त्यांच्या हालचालींबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही. त्यांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी ऋठझ, परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी गुन्हा क्रमांक १५२/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अंतर्गत प्रकरण नोंदविण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

**सायबर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोबाईल चोर जेरबंद**

रेल्वे प्रवाशांचा चोरीस गेलेला मोबाईल शोधण्यासाठी रेल्वे सुरक्षा बलाच्या उखइ पथकाने व ऋठझ यांच्या संयुक्त कारवाईत आणखी एक महत्त्वाचे यश मिळवले. गुंटूर एक्स्प्रेस (गाडी क्रमांक १७२५३) मधून चोरीस गेलेल्या ₹15,999/- किमतीच्या सॅम संग मोबाईलचा सायबर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माग काढण्यात आला. प्राप्त लोकेशनच्या आधारे आरोपी रोहित शंकर खानपटे (रा. आनंद नगर, परभणी) यास ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेला मोबाईल जप्त करण्यात आला. आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी ऋठझ च्या ताब्यात देण्यात आले असून त्याचा ऋठझ, नांदेड येथील गुन्हा क्रम ांक ५८८/२०२५ शी संबंध जोडण्यात आला आहे.

**रेल्वे प्रवाशांना आवाहन**

श्री दीपचंद्र आर्य, वरिष्ठ मंडल सुरक्षा आयुक्त, रेल्वे सुरक्षा बल, नांदेड यांनी सर्व रेल्वे प्रवाशांना प्रवासादरम्यान सतर्क व जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. प्रवाशांनी आपल्या सामानावर व वैयक्तिक वस्तूंवर सतत लक्ष ठेवावे, अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये तसेच त्यांच्याकडून अन्नपदार्थ, पिण्याचे पाणी, शीतपेये किंवा इतर कोणतेही खाद्यपदार्थ स्वीकारू नयेत. विशेषतः गर्दीच्या रेल्वे स्थानकांवर तसेच रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, रोकड, दागिने व इतर मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्यावी.

प्रवाशांनी केवळ वैध प्रवास तिकीट अथवा अधिकृत प्रवास परवानगीसह प्रवास करावा. प्रवासादरम्यान कोणतीही संशयास्पद व्यक्ती, बेवारस सामान किंवा कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ रेल्वे सुरक्षा बल (ठझऋ), शासकीय रेल्वे पोलीस (ऋठझ) किंवा कर्तव्यावरील कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्यास माहिती द्यावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत किंवा तात्काळ मदतीसाठी रेल मदत (ठरळश्र चरवरव) हेल्पलाईन क्रमांक १३९ वर संपर्क साधावा. प्रवासादरम्यान महिला प्रवाशांना कोणत्याही प्रकारची अडचण, असुरक्षितता किंवा गैरसोयीची भावना निर्माण झाल्यास त्यांनी कोणतीही शंका न बाळगता त्वरित रेल्वे सुरक्षा बलाशी संपर्क साधावा. 'मेरी सहेली' उपक्रमांतर्गत रेल्वे सुरक्षा बलाचे समर्पित कर्मचारी महिला प्रवाशांना चोवीस तास सुरक्षा, मार्गदर्शन व आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देत आहेत, ज्यामुळे त्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखकर होत आहे. 'आपली सतर्कता हीच आपल्या सुरक्षित प्रवासाची सर्वात मोठी हमी आहे.'

रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभाग रेल्वे प्रवाशांची सुरक्षा, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण तसेच रेल्वे परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रतिबंधात्मक व प्रभावी अंमलबजावणीच्या उपाययोजनांद्वारे सातत्याने कटिबद्ध असून भविष्यातही अशाच प्रभावी कारवाया सुरू ठेवणार आहे.

# देवगिरी हिल्स येथे रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ



छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - प्रभाग क्रमांक २७ मधील देवगिरी हिल्स परिसरात अमित सिंग चव्हाण यांच्या घरासमोरील रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ सभागृह नेते श्री. गोविंद केंद्रे, नगरसेवक श्री. रेणुकादास (राजुभाऊ) वैद्य, माजी नगरसेवक श्री. कैलास भाऊ गायकवाड, नगरसेविका सौ दयाताई कैलास गायकवाड तसेच नगरसेविका डॉ सौ सुनिताताई साळुंके यांच्या प्रमुख उपस्थिती करण्यात आला

यावेळी माजी नगरसेवक विनोद सोनवणे, बाबासाहेब झगरे, देविदास पवार, भगवान वाघ, देवलाल विटोरे, राम केकाण, रामदास वाघमारे, निखिल पडोळ, मंगेश शेलार, सचिन मिटकरी, जयश्री मिटकरी, जितेंद्र गावंडे, भारती गावंडे, सुरेंद्र देवकर, अनिता देवकर, सुनील गायके, सीमा गायके, गंगुबाई गायके तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाच्या कामामुळे उपस्थित नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत लोकप्रतिनिधींचे आभार मानले.

# वैजापूरात जेष्ठ नागरिक आयुष्यमान भारत कार्ड, उद्यम प्रमाणपत्र व एसआयआर जनजागृती शिबीर



वैजापूर, दि. १४ (प्रतिनिधी) - येथील गोरख मापारी सेतू सुविधा केंद्र,तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७०वर्ष वया वरील जेष्ठ नागरिकाना आयुष्यमान भारत कार्ड, महात्मा फुले आरोग्य कार्ड,तसेच युवकांना उद्यम प्रमाण पत्र, व एसआयआर मतदार यादी पुनरीक्षण बाबत माहिती मिळावी म्हणून नुकतेच संत सेना महाराज समाज मंदिरात जनजागृती शिबीर घेण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनू राजपूत, धोंडीरामसिंह राजपूत, गोरख मापारी यांनी उपस्थिताना वरील विषयाबाबत मार्गदर्शन करूनआवश्यक कागद पत्रांची पूर्तता केल्यास मापारी सुविधा केंद्रातून प्रमाण पत्र उपलब्ध करून देण्यात येईल असे मार्गदर्शन केले.मतदार यादी पुनरीक्षण बाबत ही मार्गदर्शन करून मतदारांनी लवकरात लवकर नोंदणी करावी असे आवाहन केले.या समयी काही नागरिकांना प्रमाण पत्र व कार्ड वितरित करण्यात आले. या प्रसंगी सोनू राजपूत मित्र मंडळ, गणेश महापुरे, प्रशांत त्रिभुवन, अभिजित लोखंडे, विकास पडवळ, राहुल गायकवाड, पंडित खरात, अभिषेक दाढे, काका लाडवाणी, मोहक निकम, प्रतीक अनर्थे, हिमांशू चव्हाण, शुभम लिंगायत यांनी सहकार्य केले.

# अमृत-सक्षम' उपक्रमाद्वारे कचरा व्यवस्थापनात उद्योजक होण्याची सुवर्णसंधी

छत्रपती संभाजीनगर, दि १४ (प्रतिनिधी) - कचरा व्यवस्थापन आता केवळ स्वच्छतेचे काम न राहता एक फायदेशीर 'हरित उद्योग' बनला आहे. शासनाच्या अमृत संस्थे मार्फत लक्ष्यित गटातील पात्र उमेदवारांना उद्योग उभारणीसाठी विशेष अनुदान आणि व्याज परतावा योजनेचा लाभ मिळणार आहे.

'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) आणि 'कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत-सक्षम' हा विशेष उद्योजकता विकास उपक्रम महाराष्ट्रात राबवला जात आहे. याचा तरुण उद्योजकांनी लाभ घेण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा अमृत कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत कचऱ्यापासून उत्पन्न मिळवण्याचे तंत्र, सुकलेल्या फुलांपासून अगरबत्ती निर्मिती, प्लास्टिक-कागद रिसायकलिंग आणि रिसोर्स रिकव्हरी सेंटर (RRR) सुरू करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा केवळ प्रशिक्षणाचा कार्यक्रम नसून, संकल्पनेपासून ते प्रत्यक्ष उद्योग उभारणीपर्यंतचा संपूर्ण प्रवास आहे.

कोणत्याही पूर्वानुभवाची गरज नसलेले युवक-युवती, महिला बचत गट, व्यावसायिक, निवृत्त कर्मचारी आणि सामाजिक संस्था या उपक्रमात सहभागी होऊ शकतात. अमृतच्या लक्ष्यित गटातील पात्र उमेदवारांना उद्योग उभारणीसाठी विशेष अनुदान आणि व्याज परतावा योजनेचा लाभही मिळणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://amrut-saksham.mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर नोंदणी करावी. या व्यवसायाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता AMRUT च्या युट्युब चॅनेलवर (https://youtube.com/ @mahaamrutpune) होणाऱ्या लाईव्ह सत्रात सहभागी होण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. संपर्कासाठी ७३९१०६५४७५ आणि ९४०३२००६०६या फोन नंबर वर फोन करावा. तसेच विभागीय व जिल्हा कार्यालय अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर-४ सिडको, पाण्याच्या टाकीजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ : कर्जमुक्ती आता अधिक व्यापक

**शेतकरीराजा** आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती:

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस ङ्गपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनाङ्ख हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना



वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**- विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख नावे वगळली

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थी महिलांसाठी मोठी अपडेट समोर आली आहे. शासनाकडून करण्यात आलेली ई-केवायसी प्रक्रियेनंतर तब्बल ९२ लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत.

परिणामी, अपात्र ठरलेल्या लाखो बहिणींचा दरमहा मिळणारा हप्ता आता कायमचा बंद होणार आहे. सुरुवातीला सुमारे ८० लाख महिला या योजनेतून कमी होतील असा अंदाज सरकारने वर्तवला होता; मात्र प्रत्यक्ष छाननीअंती हा आकडा ९२ लाखांच्या पार गेला आहे.

योजनेच्या पारदर्शकतेसाठी राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून अपात्र महिलांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत.

यामध्ये बीड जिल्ह्याचा आकडा सर्वाधिक मोठा आणि चक्रावून टाकणारा आहे. एकट्या बीड जिल्ह्यातून तब्बल २८ लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेत ज्या महिलांची नावे चुकीच्या किंवा तांत्रिक पद्धतीने वगळली गेली आहेत, त्यांच्या तक्रारींची योग्य दखल घेऊन चौकशी केली जाईल, अशी ग्वाही देखील सरकारकडून देण्यात आली आहे.

## अपात्र ठरण्याची कारणे कोणती?

- या पडताळणीत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, तब्बल १२ लाख महिलांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न हे सरकारने ठरवून दिलेल्या २.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. तर ४.५ लाखांहून अधिक लाभार्थी महिलांचे वय हे ६५ वर्षांपेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे.
- महिलांसाठी असलेल्या या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न चक्क पुरुषांनीही केल्याचे उघड झाले आहे. लाभार्थी यादीत तब्बल १४ हजार पुरुषांची नावे समाविष्ट असल्याचे तपासात समोर आले असून, कसून केलेल्या छाननीनंतर प्रशासनाने त्यांचे अर्ज तातडीने बाद केले आहेत.

# एस. टी. महामंडळ राज्यभर वृक्षारोपण उपक्रम; वैजापूर बस स्थानक परिसरात वृक्षारोपण



वैजापूर, दि. १४ (प्रतिनिधी) - एस.टी. महामंडळातर्फे मंगळवार (ता,१४)जुलै रोजी राज्यभर मोठ्या संख्येने वृक्षारोपण करण्यात येत आहे, याचे औचित्य साधत येथील एस. टी.आगार व बस स्थानक कर्मचारी, अधिकारी यांच्या वतीने आगार प्रमुख किरण धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली वैजापूरचे स्वच्छतादूत व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते बस स्थानक परिसरातिल खुल्या जागेवर वृक्षारोपण करून एक हजार वृक्ष लावण्याचा संकल्प सर्व उपस्थित कर्मचारी वर्गाने केला. 'झाडे लावू या-झाडे जगऊ या,झाडांचे आपण रक्षण करू या'वृक्षांच्या महत्वाची गाणी गात व संत तुकाराम महाराज यांचा अभंग'वृक्षवल्ली आम्हा सोयरी- हे अभंग गात धोंडीराम राजपूत यांनी उपस्थित कर्मचारी यांना एक हजार झाडे लावून ती जगविण्याचा संकल्प दिला.या प्रसंगी एस. टी.चे.स. वाहतूक अधिकारी जी.जे,पगारे,सहायक वाहतूक निरीक्षक बी.के. गरुड,वाहतूक नियंत्रक एस. जे.पगार, एन. व्ही. मुंजाळ,पी.एन. जाधव,वरीष्ठ लिपिक आदिनाथ मुळे, कर्मचारी,वाहक,चालक सर्वश्री प्रवीण सोनवणे,भगवान गिरी, पी.डी. भागवत,स्वच्छता अधिकारी महेश पगारे, सुरक्षा रक्षक श्री. चव्हाण व कर्मचारी उपस्थित होते.

# नीट पेपर फुटल्यावर परिक्षा परत घेतल्या जाते; मग फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका परत का नाही?

**भारत** लोकशाहीचा देश म्हणून जगप्रसिद्ध आहे.परंतू देशात अलीकडच्या काळात अजब-गजब कहानी घोडेबाजाराच्या माध्यमातून राजकीय वतुर्ळात पहायला मिळत आहे.नुकतीच देशात नीट पेपर फुटीचे प्रकार देशभर गाजले.या पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली.या दरम्यान पेपर फुटल्यानंतर सरकारने (शिक्षण विभागाने) दिड-दोन महिन्यात पुन्हा नीटची परीक्षा जाहीर केली व परीक्षा पार पडली.परंतु हाच फार्मुला फुटलेल्या आमदार-खासदारांना (राजकीय वतुर्ळात) लागू का होत नाही?असे अनेक प्रश्न आज देशाच्या १४५ करोड जनतेच्या मनात भेडसावत आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला कल्पना आहे की, राजकीय पुढारी सत्तेसाठी कुठल्याही स्तरावर जायला तयार असतो. यात सर्वसामान्यांना काहीही देणेघेणे नसते आणि नाही.परंतु देशातील प्रत्येक राज्यात सत्तेसाठी, ईडीच्या कारवाई पासून वाचण्यासाठी किंवा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती लपविण्यासाठी पक्ष फुटी, आमदार- खासदार फुटी मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि हा सर्व प्रकार देशाची १४५ कोटी जनता आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत असुन त्यांच्या भावना दुखावत आहे. देशात वेगवेगळ्या विचारांशी संबंधित वेगवेगळे पक्ष आहेत.यात त्यांची नितीमत्ता,आचार-विचार, पक्षाची बांधिलकी आणि देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रती आपुलकी अशा विविध विचारांनी प्रत्येक पक्ष बांधील असतो. परंतू अलिकडच्या काळात ज्या भाजपाला किंवा भाजपविरोधी पक्षांना एकमेकांचे विचार कधीच पटले नाही ते पक्ष आज फक्त सत्तेसाठी एकमेकांचा पक्ष व आमदार- खासदार फोडतांना दिसतात.आमदार-खासदार फोडल्यानंतर ते सत्ताधाऱ्यांना चालतात,त्यांचे आचार-विचार सुध्दा चालते;कारण या मागचा एकच उद्देश असतो तो म्हणजे सत्तेचा लोभ किंवा विरोधक संपविणे.

देशाच्या १४५ कोटी जनतेला कल्पना आहे आमदार-खासदार सत्तेसाठी फुटतात. परंतु हेच आमदार-खासदार देशाप्रती व देशाच्या जनतेप्रती घेतलेल्या शपथेचा विचार न करता सत्तेच्या लोभापोटी पक्ष बदलवितांना दिसतात ही बाब जगजाहीर आहे. परंतु पक्षांतर्गत कायद्यानुसार आमदार-खासदारांनी पक्ष सोडला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्या-त्या विधानसभा-लोकसभेच्या क्षेत्रात पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात परंतु तसे होतांना अजिबात दिसत नाही ही कसली लोकशाही म्हणावी! सरकार नीट पेपर फुटी नंतर दिड ते दोन महिन्यांत परिक्षा घेऊ शकतात तर प्रश्न निर्माण होतो की, फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका याच आधारावर ताबडतोब का घेतल्या जात नाहीत.यावरून स्पष्ट होते की सरकार सत्तेसाठी कोणत्याही स्तरावर जायला तयार आहेत.आमदार हा राज्याचे नेतृत्व करतो तर प्रत्येक खासदार हा देशाचे नेतृत्व करीत असतो आणि प्रत्येक आमदार-खासदार हा स्वतःच्या बळावर निवडून येत नसतो त्यांच्यामागे पक्षाचे पाठबळ ६० टक्के, जनतेचे पाडबळ ३० टक्के व स्वतःचे अस्तित्व १० टक्के अशा पध्दतीने प्रत्येक आमदार-खासदार निवडून येत असतो. परंतु पक्ष सोडतांना आमदार-खासदार या सर्वांना विसरतात व स्वतःला त्या क्षेत्राचा मालक (सर्वेसर्वा) समजतात.कारण त्याला सत्तेचा लोभ असतो.यावरून स्पष्ट होते की, निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी जनतेला व पक्षाला विसरतात. त्यामुळे आमदार-खासदार सत्तेसाठी उंदरासारख्या उड्या मारतांना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांना माझा सल्ला व विनंती आहे की, लोकप्रतिनिधी असतांना आपण पक्ष हमखास सोडावा यात माझा किंवा देशाच्या १४५ कोटी जनतेचा तिळमात्र विरोध नाही.परंतु पक्ष सोडतांना आमदारकी किंवा खासदारकीचा प्रथम राजीनामा द्यावा.कारण जनतेनी लोकप्रतिनिधी निवडून देतांना आपला विश्वास व्यक्तिवर दर्शविला नसतो तर पक्षावर व त्यांच्या माणुसकीवर दर्शविला असतो.त्यामुळे लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या स्वार्थासाठी जनतेचा विश्वासघात करू नये. त्यामुळे सर्वप्रथम पक्ष सोडायच्या अगोदर आमदार-खासदारकीचा (लोकप्रतिनिधीचा) राजीनामा दिला पाहिजे. तेव्हाच लोकशाही जिवंत राहिल.सरकारने नीट परीक्षेबाबत देशाच्या २२ लाख ७९ हजार ७४३ विद्यार्थ्यांचा विचार केला आणि नीट पेपर फुटल्यानंतर पुन्हा परीक्षा घेतली याचे मन:पासून स्वागत. परंतु आमदार जेव्हा फुटतो तेव्हा १४ कोटी लोकांच्या भावना दुखावतात आणि जेव्हा खासदार फुटतो तेव्हा देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावना दुखावतात.त्यामुळे सरकारने याबाबतचा गांभीर्याने संग्यान घेऊन हा खेळ खंडोबा थांबविला पाहिजे व फुटलेल्या आमदारांनी राजीनामे राज्यपालांना द्यावे व खासदारांनी राष्ट्रपतींकडे आपले राजीनामे सुपूर्द करावे व या रिक्त पदांच्या जागांवर ताबडतोब निवडणूक घेण्यात याव्यात.

अन्यथा फुटलेल्या आमदार-खासदारांना सरकारने सत्तेत घेतले तर लोकशाही धोक्यात येऊ शकते. मी या लेखाद्वारे महामहीम राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग यांना विनंती करतो की, ज्या प्रमाणे नीट पेपर फुटल्यानंतरकाही दिवसातचपुन्हापेपरघेण्यातआले.त्याचआधारावर फुटलेल्या आमदार- खासदारांच्या मुसक्या आवळण्यासाठी त्यांचे राजीनामे घेवून त्या-त्या विधानसभा-लोकसभा क्षेत्राच्या निवडणुका ताबडतोब घेण्याचे प्रावधान सरकारने ताबडतोब करावे.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# नाविन्यपूर्ण उपक्रमांतून जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी जनजागृती करा-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील सर्व जिल्ह्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून व्यापक जनजागृती करावी. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर द्यावा, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

जादूटोणा प्रतिबंधक कायद्याच्या अंमल बजावणीसाठी गठित विभागीय समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, समाज कल्याण, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्रीकांत यांनी जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल प्रकरणे, जनजागृती उपक्रम आणि उपलब्ध निधीच्या वापराचा विभागनिहाय आढावा घेत जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठका नियमित घेऊन निर्णयांची प्रभावी अंमल बजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याच्या अंमल बजावणीचाही आढावा घेण्यात आला. दाखल प्रकरणांचा वेळेत निपटारा, पीडितांना तातडीने आर्थिक मदत, पुनर्वसन आणि शासनाच्या सवलतींचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

तसेच तृतीयपंथीय हक्क संरक्षण व कल्याण मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तृतीयपंथीय व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळावा, त्यांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, अशाही सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

बैठकीत विभागातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा तसेच विविध कारणांमुळे बंद असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या स्थितीचाही आढावा घेण्यात आला.

बंद कॅमेरे तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करावेत, तसेच पोलीस ठाण्यांमध्ये प्रस्तावित सीसीटीव्ही यंत्रणेची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या. यावेळी विभागातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा सुनिल कच्छवे यांनी स्वीकारला पदभार



लातूर दि.१४ (प्रतिनिधी)- शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा पदभार विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सुनिल कच्छवे यांनी आज स्वीकारला.

पदभार स्वीकारुन त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. विभागाच्यावतीने सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी लातूरचे प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, सहायक अधीक्षक अशोक माळगे, वरिष्ठ लिपिक मनिषा कुरूलकर, कनिष्ठ लिपिक कैलास लांडगे, शिपाई अशोक बोर्डे, शेख कलीम आदी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाने ०८ जुलै २०२६ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (माहिती), गट अ (वरिष्ठ) पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने त्यांची सरळसेवेने नियुक्ती केली आहे.

# श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात भव्य चातुर्मास प्रवेश सोहळा उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, जोहरीवाडा यांच्या वतीने श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात पूज्य साध्वी भगवंतांच्या चातुर्मास प्रवेशानिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडला.

श्री विमलनाथ मंदिरातून प्रारंभ झालेली शोभायात्रा संस्थान गणपती, पानदरीबा, मच्छली खडक, गुलमंडी मार्गे श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात दाखल झाली. मार्गभर जैन धर्माच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. बँड पथकाच्या मंगलमय सुरावटींनी शोभायात्रेची शोभा अधिकच खुलून दिसली. महिलांनी पांढरे शुभ्र वस्त्र तसेच केशरी-पिवळ्या साड्या परिधान करून मंगल कलश डोक्यावर धारण केले होते. मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका शोभायात्रेत सहभागी झाले होते. या चातुर्मासासाठी पू. सा. अर्केंदुश्रीजी म. सा., विदुषी पू. सा. राजप्रज्ञाश्रीजी म. सा., पू. सा. कोटिगुणाश्रीजी म. सा. तसेच पू. सा. भव्यरत्नाश्रीजी म. सा. आदी ठाणा-६ यांचे मंगल आगमन झाले. यावेळी परम पूज्य ग. आ. भ. श्रीमद् विजय अभयदेवसूरिश्वरजी महाराजा तसेच परम पूज्य आ. भ. श्रीमद् मोक्षरत्नसूरिश्वरजी म. सा. यांचा आशीर्वादने होत आहे. जिनालयात आगमनानंतर मांगलिक, धर्मप्रवचन व नवकारशीचा कार्यक्रम पार पडला. चातुर्मास काळात अधिकाधिक धर्मआराधना, तप, स्वाध्याय व संयमाचे पालन करण्याचे आवाहन साध्वी भगवंतांनी केले. या प्रसंगी यावेळी डॉ जिंदानी हासमुख सेजस शाह सचिन भाई राहुल डोसी आनंद संचेती दीपक पाटनी राजू काठेड़ सतीश संचेती मनोज भागनिया परिवार महेंद्र जैन नीलेश बाबरिया,गिरीश मेशरी,राजेश मोमाया, गिरीश ललवानी, सौ रंजना बेन सौ शकुंतला बेन सौ पूजा बेन सौ शीनू शीनू बेन उपस्थित होते चातुर्मास समिती, श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, छत्रपती संभाजीनगर मूर्तिपूजक संघ, अभय मांगलिक मंडळ, श्री जैन अलर्ट ग्रुप, अभय मुक्ती महिला ग्रुप, पार्श्वधर्म महिला मंडळ, संस्कार महिला मंडळ, के. द. जैन महिला मंडळ, त्रिशला महिला मंडळ तसेच असंख्य श्रावक-श्राविका उपस्थित होते.

# स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा खोटा आरोप; ग्राहक प्रतिनिधीसह यूट्यूब संपादकाविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल

## कपोलकल्पित माहितीवर विश्वास ठेवू नका; महावितरणचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- महावितरणच्या स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा खोटा आरोप करून आणि सोशल मीडियाद्वारे त्याचा हेतुपुरस्सर प्रसार करीत नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करणारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक संघटनेचे नंदन मेघश्याम वेंगुर्लेकर व 'कोकणसाद' यूट्यूब न्यूज चॅनेलचे संपादक सागर चव्हाण यांच्याविरुद्ध सावंतवाडी (जि. सिंधुदूर्ग) पोलीस ठाण्यात रविवारी (दि. १२) फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले.

या खोट्या आरोप प्रकरणी महावितरणकडून गंभीर दखल घेण्यात आली. स्मार्ट मीटरबाबत कपोलकल्पित तसेच नागरिकांमध्ये भीती व दहशत निर्माण होईल असे जाहीर व रेकॉर्डेड वक्तव्य केल्याप्रकरणी नंदन वेंगुर्लेकर आणि केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी ही खोटी माहिती सर्व सोशल मीडियाच्या खात्यांवरून प्रसारित केल्याप्रकरणी यूट्यूबचे संपादक सागर चव्हाण याच्याविरुद्ध जनतेत भीती निर्माण करून गुन्ह्यास चिथावणी देणे, गुन्हेगारी पद्धतीने धमकावणे, शांततेचा भंग करण्यासाठी जाणीवपूर्वक अपमान करणे, बदनामी करणेबाबत सावंतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार कलम ३५३ (१) (बी), ३५१ (३), ३५२ व ३५६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी सावंतवाडी पोलीस पुढील तपास करीत आहे.

स्मार्ट मीटर हे पूर्णपणे सुरक्षित आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. त्यात कोणताही 'कॅमेरा' किंवा गोपनीयतेचा भंग करणारी यंत्रणा नाही. वीजग्राहकांनी स्मार्ट मीटरबाबत पूर्णतः निश्चिंत राहावे. कोणत्याही कपोलकल्पित माहिती व खोटारड्या आरोपांना बळी पडू नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरबाबत अत्यंत खोटी व काल्पनिक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्यात येत असल्याचे देखील महावितरणतर्फे स्पष्ट करण्यात आले.

याबाबत माहिती अशी की, सावंतवाडी (जि. सिंधुदूर्ग) येथे कोकणसाद यूट्यूब न्यूज चॅनेल मध्ये स्मार्ट मीटर संदर्भात चर्चासत्र ठेवण्यात आले. त्यांचे रेकॉर्डिंग शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महावितरणकडून उपकार्यकारी अभियंता योगेंद्र वाघ, ग्राहक संघटनेचे नंदन वेंगुर्लेकर तसेच दीपक पटेकर सहभागी झाले होते. यामध्ये महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत विविध फायद्यांची माहिती देण्यात आली तसेच विविध आरोपांचे सर्मपक खुलासे करण्यात आले.

तथापि, या चर्चासत्रामध्ये नंदन वेंगुर्लेकर यांनी स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा धादांत खोटा आरोप केला. स्मार्ट मीटरमुळे नागरिकांच्या खाजगी आयुष्यावर पाळत ठेवली जात असल्याचा अत्यंत हास्यास्पद दावा त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केला. याबाबत महावितरणचे श्री. वाघ यांनी त्याचवेळी स्पष्टीकरण दिले. तरीसुद्धा कोकणसाद यूट्यूब न्यूज चॅनेलने त्यांच्या इतर सोशल मीडियाच्या खात्यांवरून स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याची खोटी जाहिरात केली आणि या चर्चासत्रातील संदर्भ वगळून दिशाभूल करणारा २ ते ३ मिनिटांचा भाग 'स्मार्ट मीटरची चिरफाड' या मथळ्याखाली रिलच्या माध्यमातून हेतुपुरस्सरपणे प्रसारित केला. त्यात महावितरणकडून करण्यात आलेला खुलासा देखील वगळण्यात आला.

(पान १ वरुन)

## ५ भीषण स्फोटांनी हादरलं इराण!...

जारी करण्यात आला आहे.

तस्नीम वृत्तसंस्थेनुसार, इराणच्या लष्कराचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल मोहम्मद अकरमिनिया यांनी अमेरिकेला चोख प्रत्युत्तर दिले आहे. 'स्ट्रेट ऑफ होर्मुज हा मार्ग अमेरिकेच्या स्फोटांमुळे किंवा लष्करी कारवाईमुळे कधीही मोकळा होणार नाही. आमचे सैन्य होर्मुजमधून एक पाऊलही मागे हटणार नाही', असे ते म्हणाले. 'होर्मुज मार्ग खुला करण्याचा एकच रस्ता आहे, तो म्हणजे इराणच्या जनतेच्या अधिकारांचा आदर करणे. आम्ही आमचे शहीद आणि विशेषतः इस्लामिक क्रांतीचे शहीद नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या रक्ताचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही', असे देखील त्यांनी ठणकावून सांगितले.

## सुनेत्रा पवारांची अध्यक्षपदी निवड कायदेशीरच

सच्चिदानंद सिंह यांनी वकिलांमार्फत पाठवलेल्या या नोटिशीला कायदेशीर सल्ला घेऊनच योग्य ते उत्तर दिले जाईल, असेही तटकरे यांनी स्पष्ट केले.

२८ जानेवारीला अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली होती. मात्र, पक्षाचे माजी राष्ट्रीय सचिव आणि ज्येष्ठ नेते सच्चिदानंद सिंह यांनी या निवडीवर तांत्रिक आणि घटनात्मक आक्षेप नोंदवत अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा घेण्याची मागणी केली होती.

## पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये एटीएसची कारवाई,...

असून, पुणे जिल्ह्यातील ६० हून अधिक ठिकाणी एकाचवेळी छापेमारी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. एटीएस पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या ठिकाणी मोठी कारवाई करत पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विविध ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान काही संशयितांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती एटीएसने दिली.

एटीएसच्या प्राथमिक तपासानुसार, शहजाद भट्टी आणि त्याच्या साथीदारांनी फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम आणि व्हॉट्सअॅप यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून तरुणांशी संपर्क साधण्याचा तसेच त्यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचा संशय आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या संपर्क जाळ्याचा आणि त्यामागील उद्देशाचा शोध एटीएसकडून घेतला जात आहे. तपासाच्या अनुषंगाने आणखी काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान चार दिवसापूर्वी देखील महाराष्ट्रात विविध ठिकाणी एटीएसने ही कारवाई केली होती.

## थेट राम मंदिरावर दरोडा, संघाची नाराजी हास्यास्पद;...

हिंमत असेल, तर त्यांनी या प्रकरणातील सर्व संबंधितांना तत्काळ निष्कासित करून दाखवावे.''एल निनोमुळे दुष्काळ पडणार याचा अंदाज आधीच होता. तरीही सरकारने कोणतीही पूर्वतयारी केली नाही, असा आरोप त्यांनी केला. ''राज्यात बोगस बियाण्यांचा सुळसुळाट आहे. हे सरकारच बोगस आहे. कर्जमाफीच्या नावाखाली प्राप्तिकर विभागाची यादी मागवून वेळकाढूपणा केला जात आहे. सरकारमधील एका मंत्र्यानेच ही यादी उशिरा पाठवण्याचे निर्देश दिल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे,'' असा गंभीर आरोप सपकाळ यांनी केला.

राज्यातील सत्तेच्या समतोलावर भाष्य करताना ते म्हणाले की, सत्तेतील राष्ट्रवादी (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात मोठी धुसफूस सुरू आहे. हे ट्रिपल इंजिन सरकार नसून गँग ऑफ ट्रिपल इंजिन आहे आणि आता त्यांच्यात टोळीयुद्ध सुरू झाले आहे. अजित पवार गटात सर्व काही आलबेल नसून लवकरच हा पक्ष फुटल्याचे चित्र महाराष्ट्राला पाहायला मिळेल, असा दावाही त्यांनी केला.

## एमपीएससी ऑनलाईन परीक्षा विद्यार्थ्यांवर...

एमपीएससीने ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केल्यापासून राज्यभरातून तीव्र विरोध करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर येथे मोठे आंदोलनही करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन परीक्षांबाबत पोलीस प्रशासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विद्यार्थी, विद्यार्थी प्रतिनिधी यांची बैठक आयोजित केली होती. सुमारे अर्धा तास ही चर्चा झाली.

या बैठकीला आमदार अभिमन्यू पवार, भाजपचे राज्य सरचिटणीस राजेश पांडे, राज देशमुख यांच्यासह वास्तव कट्ट्याचे किरण निंभोरे, युवक काँग्रेस अध्यक्ष शिवराज मोरे, अक्षय जैन, अर्चना शहा, गणेश उबाळे, सरहदचे प्रमोद पाटील, लेषपाल जवळगे, महाराष्ट्र विद्यार्थी संघटनेचे अनिकेत देशमाने, नितीन आंधळे, निखिल मगर उपस्थित होते. शिष्टमंडळाने ऑनलाइन परीक्षांमध्ये असलेल्या त्रुटी, अडचणी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

एमपीएससी अध्यक्ष, सचिव यांच्यासोबत बुधवारी चर्चा करून सद्यस्थितीत ऑनलाइन परीक्षा न लादण्यासंदर्भात, तसेच भविष्यात ऑनलाइन परीक्षांकडे जायचे असल्यास एकाच वेळी सर्व परीक्षा घेता येतील, अशी यंत्रणा उभी करण्यात आल्यानंतरच ऑनलाइन परीक्षा घेण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. संयुक्त पूर्व परीक्षा ''गट क''चे अर्ज भरण्यासाठी १७ जुलैपर्यंतची मुदत असली, तरी त्याबाबक याच्यावरही पुनर्विचार करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिले.

# 'लाइटहाऊस' प्रकल्पाचा १० वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न; तरुणांच्या यशोगाथांनी उपस्थितांची मने जिंकली



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- तरुणांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'लइटहाऊस' प्रकल्पाचा १० वा वर्धापन दिन आज येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या गौरवशाली सोहळ्यात सुमारे १३० हून अधिक तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रसंगी सरकारी आणि खासगी संस्थांमधील

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या सोहळ्यादरम्यान विविध रंगतदार सांस्कृतिक सादरीकरणांनी उपस्थितांचे मनोरंजन केले. यात प्रामुख्याने शहरातील प्रसिद्ध गायक दीपक पवार यांनी आपल्या लोकप्रिय गाण्यांचे सादरीकरण करत वातावरणात एक वेगळाच आनंद निर्माण केला आणि संपूर्ण सभागृहाची मने जिंकली.

या दशपूर्ती सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'लइटहाऊस'च्या पहिल्या वर्षातील २० माजी विद्यार्थ्यांचा करण्यात आलेला विशेष सत्कार होय. त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाची आणि यशाची दखल घेत त्यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमातील सर्वात अविस्मरणीय क्षण ठरला तो म्हणजे 'फाउंडेशन कोर्स'च्या बॅच क्र. ४ मधील माजी विद्यार्थी निखिल जगताप आणि अक्षय ओव्हाळ यांनी मांडलेल्या त्यांच्या यशोगाथा. निखिल आज १२ लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर उच्च पदावर कार्यरत आहे, तर अक्षय हा 'संभाजीनगर शहर पोलीस दला'त अत्यंत अभिमानाने आपली सेवा बजावत आहे. या दोघांचा संघर्षमय ते यशस्वी असा प्रवास 'लाइटहाऊस' मॉडेलचा समाजावरील दीर्घकालीन आणि सकारात्मक प्रभाव दर्शविणारा ठरला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'फाउंडेशन कोर्स' आणि 'स्किलिंग कोर्स' यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या माध्यमातून तरुणांची मेहनत, निष्ठा आणि त्यांच्या यशाचा यथोचित गौरव करण्यात आला. प्रमाणपत्र स्वीकारताना तरुणांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, उत्साह आणि सार्थ अभिमान हा 'लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन'च्या मूळ उद्देशाचे आणि त्यांच्या कार्यातील चैतन्याचेच जणू जिवंत प्रतिबिंब ठरला, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या सोहळ्याला 'स्मार्टसिटी'च्या प्रकल्प व्यवस्थापक स्नेहा नायर, किरण आढे, मीडिया विश्लेषक अर्पिता शरद उपस्थित होते. तसेच, 'लइटहाऊस'चे विस्तार संचालक अतुल माने आणि सामाजिक कार्यकर्ते मनोहर महाडिक हे देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. 'लइटहाऊस'मधील तरुणांच्या सहकार्याने केंद्र प्रमुख पूजा आणि त्यांच्या टीमने या सोहळ्याचे आयोजन केले होते.


**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३३१२८८**
**ई-मेल** westaurangabad.ee@mahapwd.gov.in **वेब साईट** www.mahawd.gov.in

**ई-निविदा सुचना क्रं. ०१ (दुसरी वेळ) सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सक्षम वर्गातील कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (एकुण ०१ कामे)

अ) http://mahapwd.gov.in
ब) https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)**
**विभाग छत्रपती संभाजीनगर**



**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८ **मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ **वेबसाइट:** www.truhomefinance.in

**भौतिक ताबा सूचना**

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३(१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/ सह-कर्जदार/तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) , नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा १० जुलै, २०२६ भौतिक ताबा घेतला आहे कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि) कडून येथे नमूद केलेल्यारकमेसाठी व्याजासह शुल्क आकारला जाईल.कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. सौ. सुनीता जनार्धन निर्मळ (कर्जदार) २. श्री. सूरज फुलचंद उमप (सह-कर्जदार)**
**३. श्री. शुभम फुलचंद उमप (सह-कर्जदार)**
**सर्वांचा निवासी पत्ता :प्लॉट क्र. ११-बी, छत्रपती नगर, मल्हार चौक, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – ४३१००९.**
**मालमत्तेचा पत्ता :प्लॉट क्र. ११-बी, छत्रपती नगर, मल्हार चौक, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – ४३१००९.**

**थकबाकी रक्कम**

मागणी सूचना दिनांक : १७/०१/२०२६ कर्ज खाते क्रमांक SBTHAURD0000928 अंतर्गत दिनांक १२-०१-२०२६ रोजी देय असलेली रु. ६२,६५,७१७/- (अक्षरी रुपये बासष्ट लाख पासष्ट हजार सातशे सतरा फक्त) तसेच कर्ज खाते क्रमांक STUHAURD0000932 अंतर्गत दिनांक १२-०१-२०२६ रोजी देय असलेली रु. २६,९८,२०५/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख अठ्ठ्याण्णव हजार दोनशे पाच फक्त). प्रत्यक्ष ताबा दिनांक : १०/०७/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे गारखेडा, छत्रपती नगर, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर – ४३१००९ येथील सर्व्हे क्र. १९/२ मधील प्लॉट क्र. ११-बी, क्षेत्रफळ १४३.१२ चौ. मीटर, तसेच त्यावरील सर्व बांधकाम व त्यासंबंधित सर्व हक्क व उपभोगाधिकार. चतु:सीमा :पूर्वेस : प्लॉट क्र. १२पश्चिमेस : प्लॉट क्र. ११-अदक्षिणेस : ५० फूट रुंदीचा रस्ताउत्तरेस : प्लॉट क्र. ०८

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर — स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
दिनांक: १०.०७.२०२६ — ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )